## एकांकिका स्पर्धा

गेल्या वर्षापासून नाटय परिषदेतर्फे **शाखां–शाखां व नाटय परिषद घटक संस्थांमधे** "कै. प्रा. डॉ. लक्ष्मणराव देशपांडे एकांकिका स्पर्धा" ही **राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा** सुरू करण्यात आली. या वर्षीच्या एकांकिका स्पर्धेत नाटय परिषदेच्या ४९ शाखांपैकी २५ शाखांनी भाग घेतला होता. एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी नाटय परिषदेच्या यशवंत नाटयमंदिर, माटुंगा, मुंबई येथील नाटयगृहात दिनांक ५ नोव्हेंबर २००९ रोजी घेण्यात आली. अंतिम फेरीसाठी निवडण्यात आलेल्या ९ एकांकिकांतून पहिल्या तीन एकांकिकांना रोख बक्षीसे देण्यात आली ती खालीलप्रमाणे :–

| **एकांकिकेचे नांव** | **शाखेचे नांव** | **बक्षिस रू.** |
|---|---|---|
| दृष्टी | पुणे उपनगरीय शाखा | १५,०००/- |
| द डेथ ऑफ ए कॉन्करर | मध्यवर्ती | ११,०००/- |
| आभास | अहमदनगर शाखा | ८,०००/- |

तसेच लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट स्त्री आणि पुरूष कलावंत, नेपथ्य, प्रकाशयोजना यासाठीही पारितोषिके प्रत्येकी प्रथम कमांक रू. १५००/–, व्दितीय कमांक रू. १०००/– आणि तृतिय कमांक रू: ५००/– देण्यात आली. तसेच प्रत्येक विभागासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरणाचा हा सोहळा दि. ५ नोव्हेंबर २००९ रोजी रंगभूमी दिनानिमित्त सायं ७.०० वाजता संपन्न झाला.

## यशवंत नाटयमंदिर

आपल्या यशवंत नाटयमंदिरास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणाऱ्या कार्यक्रमात उत्तरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात नाट्यगृहात एकूण ६०५ कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी कार्यक्रम, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा इत्यादिंचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिध्द व्यक्तींनी नाटयगृहास भेट दिली आहे.

दिनांक २२ एप्रिल २००९ रोजी रात्रीचा कार्यक्रम संपल्यानंतर नाट्यगृह बंद असताना नाट्यगृहाच्या स्टेजला आग लागली होती. सदर आगीत नाट्यगृहाच्या स्टेज व स्टेजच्या आजूबाजूचे नुकसान झाले. नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम १४ जून २००९ पर्यंत पूर्ण करण्यात आले व नाट्यगृह आपल्या १४ जून च्या पारितोषिक वितरण समारंभापासून पुर्ववत सुरु करण्यात आले. नाटयगृहाच्या दुरुस्तीच्या कामाची जबाबदारी आणि विम्याची रक्कम मिळण्यासाठीचे सर्व काम पाहण्यासाठी मानद म्हणून श्री. दीपक करंजीकर यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी आत्मियतेने संपूर्ण कामाची जबाबदारी पार पाडली. संपूर्ण काम आपले विश्वस्त आणि वास्तू विशारद श्री. शशी प्रभु यांच्या मार्गदर्शन आणि देखरेखीखाली पूर्ण करण्यात आले. संकुलाचे काम पुर्ण करण्यासाठी आर्थिक निधी अपुरा पडत होता त्यावेळी काही नियामक मंडळ सदस्य आणि मराठी नाटय व्यावसायिक निर्माता संघाने आर्थिक सहाय्य केले होते. विमा रक्कम मिळाल्यानंतर त्यांनी दिलेली रक्कम त्यांना परत करण्यात आली.